# नाथाजी लाड

प्रमोद लाड

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सातारच्या प्रतिसरकाराला अनन्यसाधारण महत्व आहे. १९४२ च्या चले जाव स्वातंत्र्यलढ्याच्या काळात २०० भूमिगत क्रांतिकारकांची सभा पणुंब्रे ता. शिराळा येथे ३ ऑगस्ट १९४३ रोजी झाली. त्या सभेत नाथाजी लाड यांची प्रतिसरकारच्या डिक्टेटरपदी (सर्वाधिकारी) एकमताने निवड झाली. धाडसी स्वभाव, कुशाग्र बुध्दी, नियोजनबध्द काम हे गुण असणाऱ्या नाथाजी लाड यांनी ही निवड सार्थ ठरवली. तत्कालीन सातारा जिल्ह्यामध्ये अनेक क्रांतिकारी व धाडसाची कामे उत्कृष्ट नियोजन करून पार पाडली. आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने ब्रिटिश सरकारला सळो की, पळो करुन सोडले. कुंडल ता. पलूस जि. सांगली येथे २ जानेवारी १९१२ रोजी त्यांचा जन्म झाला. कुंडल हे गाव क्रांतिकारकांची खाण म्हणून प्रसिध्द आहे. क्रांतिअग्रणी जी. डी. लाड, आप्पासाहेब लाड, कॅ. राम लाड इ. क्रांतिकारक याच गावचे आहेत. कुंडल येथे इंग्रजी ७ वी पर्यंतचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. सुप्रसिध्द कवी ग. दि. माडगूळकर हे त्यांचे वर्गमित्र होते. विद्यार्थीदशेत ते नाईक गुरुजींचे (माजी केंद्रीय मंत्री राम नाईक यांचे पिताजी) आवडते विद्यार्थी होते.

**तासगांव मोर्चा** – क्रांतिसिह नाना पाटील यांच्या प्रेरणेने नाथाजी यांनी स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली. क्रांतिलढ्यातील त्यांचे सहकारी त्यांना ‘सुरेशबाबू’ या नावाने ओळखत असत. ३ सप्टेंबर १९४२ च्या इतिहासप्रसिध्द तासगांव मोर्चामध्ये नाथाजी यांचा सिंहाचा वाटा होता. तासगांव मोर्चानंतर ब्रिटिश सरकारने दडपशाहीचे धोरण स्विकारल्यामुळे क्रांतिसिंह नाना पाटील, नाथाजी लाड, इत्यादी नेते भूमिगत राहून कार्य करु लागले.राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी दिलेल्या ‘करेंगे या मरेंगे’ या आदेशाप्रमाणे व क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार नाथाजी यांनी अनेक धाडसी कामे करण्यात पुढाकार घेतला. त्यामुळे सातारा जिल्ह्यामध्ये ब्रिटिश सत्ता ही नावालाच राहिली होती. खरे राज्य प्रतिसारकारचे होते. त्याचे पडसाद तत्कालीन ब्रिटिश पार्लमेंटमध्ये उमटले होते.

**धाडसी कामे** – शेणोली स्टेशन व डाक बंगला जाळणे, पगाराची गाडी लुटणे, वारणा ते निरेपर्यंत २०० टेलीफोन खांब पाडून एका रात्रीत तारा तोडणे, इत्यादी धाडसी कामांचे नियोजन नाथाजी व त्यांचे सहकारी करत होते. जुलमी ब्रिटिश सरकारच्या गोळीबारामुळे भाई कोतवाल ३० डिसेंबर १९४२ ला हुतात्मा झाले. त्यांच्या प्रथम वर्षश्राध्दाच्या दिवशी नाथाजी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुणे मुंबईची लाईट एका रात्रीस बंद करुन त्यांना खरी श्रध्दांजली वाहिली. नाथाजी जनतेला ‘देशासाठी एक दिवस संप’ असे आवाहन करत असत.

**प्रतिसराकरमधील कार्य** – क्रातिसिंह नाना पाटील, नाथाजी लाड इ. नेत्यांना पकडण्यासाठी ब्रिटिश सरकारने पकड वारंट काढली. बक्षिसे जाहीर केली. त्याला न जुमानता नाथाजी हे क्रांतिसिंहाच्या हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित असलेल्या सभा कौशल्याने पार पाडत असत. स्वतःचे लग्न क्रांतिसिंहाची बहीण गंगूबाई यांच्याशी साधेपणाने करुन जनतेला आदर्श घालून दिला. सर्वसामान्य जनतेमधील नवरा बायको यांची भांडणे मिटवणे, नवऱ्याने बायकोला नांदवण्याला भाग पाडणे, ही कामे प्रतिसरकारांमार्फत केली जात. सावकार व गुंडामार्फत होणाऱ्या त्रासाचा बंदोबस्त प्रतिसरकारचे नेते करत असत. त्यात नाथाजी आघाडीवर असत.

अशाप्रकारे नाथाजी लाड यांनी स्वातंत्र्य लढ्यात व प्रतिसराकरमध्ये महान कार्य केले आहे. स्वातंत्र्यानंतर नाथाजी (दादासाहेब) लाड यांनी सत्तेची हाव न धरता तन, मन, धनाने शैक्षणिक कार्य साठी आजन्म वाहून घेतले. असे

उदाहरण महाराष्ट्रात क्वचितच सापडेल. अशा प्रकारे सत्ता व प्रसिद्धीपासून दूर राहून शैक्षणिक कार्य कार्य करत असताना ७ डिसेंबर २००३ रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. दादासाहेबांचे आवडते शैक्षणिक कार्य पुढे चालू ठेवणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे.

*